ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५७ • सोमवार दि.२३ नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

नांदेडमधून राज्य सरकारविरोधात जनआंदोलन उभारणार : नाना पटोले

दुष्काळ,पाणीटंचाई, टँकर माफियांवरून सरकारवर आरोप



नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील दुष्काळी परिस्थिती, वाढती पाणीटंचाई, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न तसेच सरकारच्या धोरणांविरोधात काँग्रेस नांदेडमधून व्यापक जनआंदोलन उभारणार असल्याची घोषणा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केली. सोमवारी नांदेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी राज्य सरकारवर विविध मुद्द्यांवरून जोरदार टीका करीत सरकारला जनतेच्या प्रश्नांचा जाब विचारण्याचा इशारा दिला.

नांदेड जिल्ह्यासह परिसरात पाणीटंचाईचे संकट गंभीर होत असताना सरकारकडून अपेक्षित उपाययोजना होत नसल्याचा आरोप पटोले यांनी केला. इसापूर धरणातील पाण्याचे योग्य नियोजन करून नागरिकांना आणि शेतीला आवश्यक पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर टँकर माफिया सक्रिय असल्याचा आरोपही त्यांनी केला. टँकरच्या माध्यमातून भ्रष्टाचार सुरू असून पाणीटंचाईच्या संकटाचा गैरफायदा घेतला जात असल्याचे ते म्हणाले. या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून सर्वसामान्य नागरिकांनाही आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत मायक्रोफायनान्स कँमन्यांकडून कर्जवसुलीसाठी केली जाणारी सक्ती अन्यायकारक आहे. त्यामुळे मायक्रोफायनान्स कँमन्यांची सक्तीची कर्जवसुली तातडीने थांबविण्यात यावी, अशी मागणी पटोले यांनी केली. संकटाच्या काळात सरकारने कर्जदारांना दिलासा देण्याऐवजी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.निवडणूक प्रक्रियेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. आगामी निवडणुका ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. मागील निवडणुकांमधील मतमोजणी प्रक्रियेबाबतही त्यांनी शंका व्यक्त करीत निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि जनतेचा विश्वास कायम राखण्यासाठी **पान ४ वर**

माजी मुख्यमंत्र्यांच्या शोरुममध्ये चोरी

चोरट्यांनी थेट तिजोरीच पळवली

नांदेड/प्रतिनिधी-माजी मुख्यमंत्री आणि खासदार अशोक चव्हाण यांच्या मालकीच्या जया हुंडाई या कार शोरूममध्ये अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. (रविवार) रात्रीच्या सुमारास दोन चोरट्यांनी शोरूममध्ये घुसून थेट तिजोरीच उचलून नेल्याची घटना घडली. चोरीचा हा सर्व प्रकार शोरूममधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. माजी मुख्यमंत्र्यांच्या शोरुममध्येच चोरी झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, काल रात्री सुमारे ९ वाजून ३ मिनिटांच्या सुमारास दोन अज्ञात चोरट्यांनी जया हुंडाई शोरूमच्या परिसरात प्रवेश केला. शोरूममध्ये घुसल्यानंतर या चोरट्यांनी तिथे असलेली संपूर्ण तिजोरीच उचलली आणि घटनास्थळावरून पोबारा केला. रात्रीच्या वेळी घडलेल्या या धाडसी चोरीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा आणि फॉरेन्सिक टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी संपूर्ण परिसराची पाहणी केली असून फॉरेन्सिक टीमकडून बोटांचे ठसे व इतर पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. तसेच, पोलिसांनी शोरूममधील सीसीटीव्ही फुटेज आपल्या ताब्यात घेतले आहे. फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढला जात असून, आरोपींच्या शोधासाठी पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले आहे.चोरट्यांनी पळवून नेलेल्या या तिजोरीत नेमकी किती रक्कम होती किंवा त्यामध्ये कोणती महत्त्वाची कागदपत्रे होती, याचा अधिकृत तपशील अद्याप समोर आलेला नाही. पोलीस आणि शोरूम व्यवस्थापनाकडून रोख रकमेचा आढावा घेण्याचे काम सुरू आहे. शहरभरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू असून, लवकरात लवकर या चोरट्यांचा सुगावा लावून त्यांना अटक केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

यशवंत पाध्ये पत्रकारीता पुरस्कार प्रेरणादायी-संजीव कुळकर्णी



नांदेड/प्रतिनिधी-पत्रकारितेच्या ३० ते ३५ वर्षांच्या प्रवासात अनेक पुरस्कार मिळाले; मात्र ज्येष्ठ पत्रकार यशवंत पाध्ये यांच्या नावाने मिळालेला पुरस्कार माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. अशी भावना ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र संपादक परिषद, मुंबईच्या वतीने दिला जाणारा कै. यशवंत पाध्ये स्मृती पुरस्कार २०२६ रोजी संजीव कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी बोलतांना ते म्हणाले की, २०११ मध्ये त्यांच्याच हस्ते अनंत भालेराव पुरस्कार मिळाला होता. आज त्यांच्याच नावाचा स्मृती पुरस्कार स्वीकारताना जुन्या आठवणींना उजाळा मिळाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. भाजपा नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख आणि ज्येष्ठ पत्रकार कृष्णा शेवडीकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या ॲड. किशोर देशमुख, महेश खोमणे, चारुदत्त चौधरी, धोंडोपंत विष्णुपुरीकर, ॲड. प्रदीप नागापूरकर उपस्थित होते. संजीव कुलकर्णी यांचे मराठवाड्याच्या पत्रकारितेतील योगदान महत्त्वपूर्ण असून, त्यांच्या कार्याची योग्य दखल या पुरस्काराच्या माध्यमातून घेण्यात आली असल्याचे कृष्णा शेवडीकर यांनी सांगितले. तर कुलकर्णी यांच्या निर्भीड पत्रकारितेत भल्याभल्यांना गारद करण्याची ताकद असल्याचे ॲड. किशोर देशमुख म्हणाले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन नरेश दंडवते यांनी तर प्रास्ताविक प्रदीप नागापूरकर यांनी केले. वरील कार्यक्रमात भाजपाचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, माजी नगरसेवक महेश खोमणे, पत्रकार चारुदत्त चौधरी, धोंडोपंत विष्णुपुरीकर यांनी कुळकर्णी यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल आपल्या भावना व्यक्त **पान ४ वर**

या दरम्यान महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष, काँग्रेस नेते आ.नाना पटोले हे शासकीय विश्रामगृहावर आलेले होते. नंतर त्यांनी संजीव कुळकर्णी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांचे अभिनंदन केले. काँग्रेस खा.रवींद्र चव्हाण यांनीही कुळकर्णी यांचा स्वतंत्रपणे सत्कार केला. यावेळी माजी उपमहापौर आनंद चव्हाण, मुन्ना अब्बास, तिरुपती कोंढेकर, श्रावण रॅपनवाड, विठ्ठल पावडे, राजेश पावडे आदी उपस्थित होते.

खंजर बाळगणाऱ्या तरुणास अटक

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील डीआरएम कार्यालयासमोर खंजर घेवून फिरणाऱ्या एका तरुणास विमानतळ पोलीसांनी अटक केली आहे. गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने शेख मोहम्मद कैफ शेख गौस (वय २५) रा. फारुकनगर, नांदेड हा तरुण रविवारी सकाळी खंजर घेवून डीआरएम कार्यालयासमोर फिरत असतांना विमानतळ पोलीसांनी त्यास ताब्यात घेतले. त्याच्या जवळून एक खंजर जप्त केला आहे. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोधरा हत्याकांडातील एका दोषीची जन्मठेप स्थगित-सुप्रिम कोर्ट

नवी दिल्ली: गोधरा रेल्वे जळीतकांड प्रकरणातील जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या इरफान सिराज पाडा याची प्रकृती लक्षात घेऊन न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती एम. एम. सुंदेश आणि न्या. पी. बी. वराळे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

राम मंदिर निर्माण आंदोलना दरम्यान २७ फेब्रुवारी २००२ रोजी गुजरातमधील गोधरा रेल्वे स्थानकाजवळ साबरमती एक्स्प्रेसच्या एका डब्याला आग लागली होती. या घटनेत ५९ कारसेवकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर जातीय दंगली उसळल्या होत्या. या प्रकरणात मार्च २०११ मध्ये विशेष न्यायालयाने ३१ जणांना दोषी ठरवले होते. त्यापैकी ११ जणांना फाशी, तर २० जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. अन्य ६३ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. २०१७ मध्ये गुजरात उच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा झालेल्या ११ दोषींची शिक्षा जन्मठेपेत रूपांतरित केली, तर अन्य २० जणांची जन्मठेप कायम ठेवली होती. या प्रकरणातील अपिले २०१८ पासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. या प्रकरणात इरफानला जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली होती. आरोग्याच्या समस्यांमुळे शिक्षा स्थगित करण्याची मागणी केली होती. त्याच्या वकिलांनी मांडलेल्या वैद्यकीय अडचणी वस्तुस्थितीला धरून असल्याचे राज्य सरकारच्या वकिलांनीही मान्य केले. वैद्यकीय कारणास्तव शिक्षा स्थगित करण्यास सरकारचा आक्षेप नसल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. त्यानंतर खंडपीठाने हा दिलासा दिला. या निर्णयात प्रकरणाच्या मूळ गुणवत्तेवर कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही. या प्रकरणातील काही दोषींना यापूर्वीही सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मिळाला आहे. मे मध्ये अब्दुल रहमान धंतिया ऊर्फ कँकट्टो ऊर्फ जंबूरो याला कौटुंबिक आणि वैद्यकीय परिस्थितीमुळे अंतरिम जामीन देण्यात आला होता. डिसेंबर २०२२ मध्ये फारूक यालाही १७ वर्षांहून अधिक काळ तुरुंगवास भोगल्याच्या पार्श्वभूमीवर जामीन मिळाला. एप्रिल २०२३ मध्ये आणखी आठ दोषींना जामीन मंजूर करण्यात आला होता.

उमाटवाडी येथील जुगार अड्डयावर पोलीसांची धाड;चार जणांना अटक



नांदेड/प्रतिनिधी-मुदखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील उमाटवाडी परिसरात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर रविवारी पोलीसाच्या पथकाने धाड टाकुन जुगार खेळणाऱ्या चार जणांना अटक केली. त्यांच्याकडून १ लाख ७६ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.

उमाटवाडी गावाजवळील गायरान जमीनीवरील एका शेडमध्ये जुगाराचा अड्डा सुरु असल्याची माहिती मुदखेड पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक गणेश कराड यांच्या नेतृत्वाखाली पोलीसाच्या एका पथकाने रविवारी सदरील जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना जगन संभाजी सोमवारे (वय ४६) रा.येळी ता.लोहा, भुजंग केशव शिंदे (वय २३) रा.रोही पिंपळगाव, संभाजी गंगाधर जाधव (वय २४) रा. माळकौठा, कृष्णा दिगंबर कल्याणे (वय २४) रा.मुगट यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्या जवळून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व दोन मोबाईल असा १ लाख ७६ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. चार जणांविरुध्द मुदखेड पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेती वाहतूक करणारा हायवा पोलीसांनी केला जप्त

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील साईबाबा कमानीजवळ रविवारी पहाटे अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा नांदेड ग्रामीण पोलीसांनी पकडला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस पथक रविवारी पहाटे गस्त घालीत असतांना वसरणी रोडवरील साईबाबा कमानीजवळ अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा ट्रक क्र.एमएच २६ सी.पी.७९०९ पोलीसांनी पकडला. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात राहुल सरवर व अमित हंबर्डे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मूठभर विघ्नसंतोषींच्या नादात माहूरची शांतता पणाला कशासाठी?

सरफराज दोसानी

माहूर: ऐतिहासिक, पौराणिक आणि सर्वधर्मसमभावाचा वारसा लाभलेल्या माहूर शहराची ओळख सामाजिक एकोपा आणि बंधुभावाची आहे. १९८४ मधील दुर्दैवी घटनेचा अपवाद वगळता येथे धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या घटना घडलेल्या नाहीत. मात्र अलीकडील घटनांमुळे शहरातील शांततेला गालबोट लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

टिपू सुलतान जयंतीच्या मिरवणुकीत आक्षेपार्ह गाणे वाजविल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला, तर त्यानंतर टिपू सुलतान यांचे बॅनर फाडल्याप्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले. या घटनांमुळे शहरात तणाव निर्माण झाला आणिसलग दुसऱ्या दिवशी आठवडी बाजाराच्या दिवशीही बंद पाळण्याची वेळ आली. पोलिसांनी शांतता समितीच्या माध्यमातून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केले.मात्र, काही मोजक्या व्यक्तींच्या चुकीच्या कृतींची शिक्षा संपूर्ण शहराला का भोगावी लागावी? आक्षेपार्ह गाणी वाजविणे चुकीचेच, तर त्याला प्रत्युत्तर म्हणून कायदा हातात घेणेही तितकेच चुकीचे. एका चुकीचे समर्थन दुसऱ्या चुकीने होऊ शकत नाही. मूठभर विघ्नसंतोषींच्या कृत्यांमुळे दोन समाजांमध्ये अविश्वासाची भिंत उभी राहणे ही माहूरच्या सामाजिक परंपरेला न शोभणारी बाब आहे. माहूर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. देवी रेणुका माता, भगवान दत्तात्रेय, अनसूया माता आणि बाबा सोनापीर यांच्या पवित्र भूमीत सर्वधर्मीयांनी वर्षानुवर्षे जपलेला बंधुभाव हीच शहराची खरी संपत्ती आहे. या वातावरणाला तडा गेल्यास नुकसान कोणत्याही एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण माहूरचे होणार आहे. प्रशासनाने दोषींवर निष्पक्ष कारवाई करावी; मात्र नागरिकांनीही अफवा, चिथावणीखोर संदेश आणि भावनिक आवाहनांना बळी पडू नये. सोशल मीडियावरील प्रत्येक संदेशाला सत्य मानून प्रतिक्रिया देण्यापेक्षा संयम आणि विवेक दाखविण्याची हीच वेळ आहे.माहूर कोणाच्या एकट्याच्या मालकीचे नाही. हे शहर सर्वांचे आहे आणि त्याची शांतता जपण्याची जबाबदारीही सर्वांचीच आहे. मतभेद असावेत, पण मनभेद नकोत. मूठभर विघ्नसंतोषींच्या नादात वर्षानुवर्षे जपलेली सामाजिक वीण उसवू देऊ नका. कारण माहूरची खरी ओळख संघर्षात नाही, तर सर्वधर्मीयांच्या एकतेत आहे.

विधानसभा अध्यक्ष नार्वेकरांवर कारवाई करा

खा.संजय राऊतांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई/प्रतिनिधी-अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी गावातील आदिवासींच्या जमिनींच्या कथित खरेदी-विक्रीवरून राज्याचे राजकारण तापले आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर जमिनी लाटल्याचा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खा.संजय राऊत यांनी केला आहे. या प्रकरणाची चौकशी करून नार्वेकर यांना पदावरून दूर करण्याची मागणी राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे. दरम्यान, हे सर्व आरोप फेटाळत नार्वेकर यांनी आपली बाजू स्पष्ट केली आहे.

संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, अलिबाग तालुक्यातील आदिवासी समाज आपल्या जमिनींच्या प्रश्नावरून आंदोलन करीत आहे. या आंदोलकांवर पोलिसांकडून दबाव टाकला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. विधानसभा अध्यक्षांच्या दबावाखाली हे प्रकार घडत असतील, तर त्यांना तातडीने पदावरून दूर करणे आवश्यक आहे. राहुल नार्वेकर आणि त्यांचे बंधू मकरंद यांनी अलिबाग तालुक्यात मोठ्या प्रमाणावर जमीन खरेदी केल्याचा दावाही राऊत यांनी केला आहे.दरम्यान, या आरोपांना उत्तर देताना राहुल नार्वेकर म्हणाले की, संजय राऊत यांच्या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नाही. संबंधित जमीन आदिवासींची नसून भोगवटा वर्ग **पान ४ वर**

सोने काळवंडले!

भारत हा देश कधीकाळी 'सोने की चिडियॉ' म्हणून ओळखला जायचा. देशाची आर्थिक समृद्धी, व्यापारपेठा आणि संपत्ती यांचे प्रतीक म्हणून सोन्याकडे पाहिले जात असे. सोने हा केवळ मौल्यवान धातू नसून भारतीय संस्कृती, परंपरा, प्रतिष्ठा आणि आर्थिक सुरक्षिततेशी जोडलेले आहे. त्यामुळेच भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात सोन्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. अमेरिकेसारख्या महासत्तेच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणावर सोन्याचा साठा आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतही सोन्याला महत्त्वाचे स्थान आहे. मात्र, आज याच सोन्याच्या बाजारभावात होणाऱ्या चढ-उतारांमुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात सोन्याचे भाव आजच्या तुलनेत अत्यंत कमी होते. मात्र, त्या काळात सामान्य नागरिकांची आर्थिक परिस्थिती अशी नव्हती की, त्यांना सहजपणे सोने खरेदी करता येईल. नव्वदच्या दशकानंतर आर्थिक उदारीकरण, जागतिक बाजारपेठेतील बदल आणि गुंतवणुकीच्या वाढत्या प्रवाहामुळे सोन्याच्या किमतीत सातत्याने वाढ होत गेली. भारतीय समाजजीवनात तर सोन्याचे स्थान विशेष आहे. विवाहसोहळ्यात मुलीला सोन्याचे दागिने देणे ही केवळ परंपरा नसून अनेक कुटुंबांसाठी प्रतिष्ठेचा आणि सामाजिक सुरक्षिततेचा विषय बनला आहे. आर्थिक परिस्थिती कितीही बेताची असली, तरी मुलीच्या लग्नात किमान काही प्रमाणात सोने देण्याची अपेक्षा आजही अनेक कुटुंबांमध्ये दिसून येते. त्यामुळे सोन्याच्या वाढत्या किमतींचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य कुटुंबांना बसतो. दुसरीकडे, सोने हा केवळ दागिन्यांचा विषय राहिलेला नाही. गुंतवणुकीचा सुरक्षित पर्याय म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. शेअर बाजारातील अस्थिरता, महागाई, युद्धजन्य परिस्थिती आणि आर्थिक अनिश्चितता निर्माण झाली की गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. मात्र, अलीकडील काळात सोन्याच्या दरात घसरण होण्याची चर्चा सुरू झाली आहे. जागतिक बाजारपेठेतील बदल, डॉलरचे मूल्य, अमेरिकेतील व्याजदर विषयक धोरणे, गुंतवणूकदारांकडून नफावसुली आणि इतर मालमत्तांमधील गुंतवणुकीकडे वाढणारा कल ही त्यामागील संभाव्य कारणे आहेत. सोन्याचे भाव वाढले म्हणजे अर्थव्यवस्था संकटात आहे आणि भाव घसरले म्हणजे अर्थव्यवस्था मजबूत झाली, असे सरसकट समीकरण मांडता येणार नाही. कारण सोन्याच्या किमतींवर अनेक आंतरराष्ट्रीय घटकांचा एकत्रित परिणाम होत असतो.काही काळापूर्वी पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाली होती. इंधनपुरवठा, पेट्रोल-डिझेलचे दर आणि नैसर्गिक वायूच्या उपलब्धतेबाबत चिंता व्यक्त केली जात होती. अशा परिस्थितीत भारतासारख्या आयातप्रधान देशाच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही नागरिकांना काही काळ सोने खरेदी टाळण्याचे किंवा अत्यावश्यक असेल तरच खरेदी करण्याचे आवाहन केले होते. देशातील परकीय चलनसाठ्यावर आणि आयात खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या व्यापक आर्थिक चिंतेतून अशा आवाहनांकडे पाहता येईल. मात्र, आज सोन्याच्या दरात होणाऱ्या घसरणीचे श्रेय केवळ त्या आवाहनाला देणे आर्थिक वास्तवाचे अतिसुलभीकरण ठरेल. बाजारपेठेतील घडामोडींचा संबंध एका व्यक्तीच्या आवाहनाशी जोडण्याऐवजी त्यामागील जागतिक आर्थिक कारणांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. सोन्याच्या किमती आणि देशांच्या चलनाचे मूल्य यांचा संबंधही समजून घेणे महत्त्वाचे आहे. अनेक देशांच्या मध्यवर्ती बँका सोन्याचा साठा परकीय चलनसाठ्याचा महत्त्वाचा भाग म्हणून ठेवतात. आर्थिक संकटाच्या काळात हा साठा देशाच्या आर्थिक विश्वासार्हतेला आधार देऊ शकतो. मात्र, एखाद्या देशाच्या चलनाचे मूल्य केवळ सोन्याच्या किमतीवर ठरत नाही. त्या देशाची आर्थिक उत्पादकता, व्यापारातील स्थिती, परकीय चलनसाठा, महागाई आणि मध्यवर्ती बँकेचे धोरण यांचाही त्यावर प्रभाव असतो. त्यामुळे सोन्याचे भाव घसरले म्हणजे संबंधित देशांचे चलनही घसरेल, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.आज सोन्याच्या बाजारभावातील चढ-उतार हा केवळ गुंतवणूकदारांच्या नफ्या-तोट्याचा विषय राहिलेला नाही. त्याचा संबंध सामान्य कुटुंबांच्या बचतीशी, विवाहाच्या खर्चाशी, देशाच्या आयात बिलाशी आणि जागतिक आर्थिक स्थैर्याशी जोडलेला आहे. सोन्याचे भाव घसरले तर ग्राहकांना दिलासा मिळू शकतो; मात्र त्याच वेळी सोन्यात बचत करणाऱ्या नागरिकांच्या मालमत्तेचे बाजारमूल्य कमी होऊ शकते. म्हणूनच भाववाढ किंवा भावघट याकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे ठरेल. भारताला पुन्हा आर्थिकदृष्ट्या समृद्ध बनवायचे असेल, तर केवळ सोन्याच्या साठ्याचा अभिमान बाळगून चालणार नाही. उत्पादन, निर्यात, रोजगार निर्मिती, कृषी क्षेत्राची मजबुती आणि परकीय चलनाची बचत या मूलभूत बाबींवर लक्ष केंद्रित करावे लागेल. सोन्याचे भाव आज वाढतील किंवा उद्या घसरतील; मात्र देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असेल तरच खऱ्या अर्थाने समृद्धी टिकून राहील. कधीकाळी 'सोने की चिडियॉ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतात आज सोन्याचे भाव सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असतील, तर त्यामागील आर्थिक वास्तवाचाही विचार करावा लागेल. सोन्याची चमक बाजारभावाने ठरत असली, तरी देशाची खरी श्रीमंती सामान्य माणसाच्या जीवनमानात आणि आर्थिक सुरक्षिततेत दिसली पाहिजे. अन्यथा सोन्याच्या चकाकीत देशाच्या आर्थिक प्रश्नांवरील काळी सावली कायम राहील!

लोकानुभवांतून उलगडलेले नेतृत्वाचे आत्मकथन!



ग्रंथसमीक्षा
पंडित पवळे
शिक्षणयोगी,नांदेड.

राजकारण म्हणजे केवळ सत्तेचा प्रवास नसतो, तर त्यामागे असतो सामाजिक परिस्थितीचा अभ्यास, माणसांशी जोडलेली नाती, निर्णयांची गुंतागुंत आणि काळानुरूप बदलणाऱ्या आव्हानांचा सामना.सार्वजनिक जीवनात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या व्यक्तीचे आत्मकथन वाचताना या सगळ्या पैलूंचा मागोवा घेता येतो. ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे 'लोक माझे सांगाती...' हे आत्मकथन त्याच दृष्टीने महत्त्वाचे ठरते.दहा वर्षांपूर्वी वाचलेल्या या पुस्तकाचे पुन्हा एकदा वाचन करताना अनेक आठवणी, राजकीय घडामोडी आणि व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू नव्याने उलगडले. हे पुस्तक केवळ एका राजकीय नेत्याच्या आयुष्याचा आलेख मांडत नाही, तर महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि कृषीविषयक वाटचालीचेही अनेक संदर्भ वाचकांसमोर ठेवते.

अनुभव, संघर्ष आणि लोकसंपर्काचा प्रवास

'लोक माझे सांगाती...' या आत्मकथनाची मांडणी नऊ भागांत करण्यात आली आहे.'मूस घडताना', 'दिशेचा शोध', 'सूर सापडला' अशा शीर्षकांतून बालपण, कौटुंबिक संस्कार, शिक्षण आणि राजकीय जडणघडणीचा मागोवा घेतला आहे. पुढील भागांत मंत्रिपदाची पहिली कारकीर्द, पुलोदची स्थापना, नामांतराचा प्रश्न, मंडल आयोगाची अंमलबजावणी, काँग्रेसमधील वाटचाल, राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना, संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार, कृषीक्षेत्रातील प्रश्न आणि केंद्रीय मंत्रिपदाच्या काळातील अनुभव उलगडले आहेत.

काटेवाडीच्या ग्रामीण वातावरणातून सुरू झालेला प्रवास बारामती, पुणे, मुंबई, दिल्ली आणि राष्ट्रीय राजकारणापर्यंत पोहोचतो.या प्रवासात व्यक्ती, संस्था, सहकार, शेती, उद्योग, शिक्षण आणि सामाजिक प्रश्न यांचा परस्परसंबंध लेखकाने मांडला आहे. विशेषतः ग्रामीण भागातील माणसांशी असलेला संपर्क, त्यांच्या अडचणी जाणून घेण्याची वृत्ती आणि विविध क्षेत्रांतील माहिती मिळवण्याची उत्सुकता या बाबी लक्षवेधी आहेत.या आत्मकथनातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे कौटुंबिक जीवन. पत्नी प्रतिभा पवार यांची साथ आणि कन्या खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केलेल्या वडिलांविषयीच्या भावना यांतून सार्वजनिक जीवनातील व्यक्तीचे कौटुंबिक रूप समजते. घरातील संवाद, साहित्य, नाटक, चित्रपट, शेती, विज्ञान आणि राजकारण अशा विविध विषयांवरील चर्चा यांतून ज्ञानाची देवाणघेवाण आणि सतत शिकत राहण्याची भूमिका अधोरेखित होते.महिलांनी स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रात प्रगती करावी, हा विचार त्यांच्या कौटुंबिक दृष्टिकोनातूनही व्यक्त होतो.

या पुस्तकातील व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना शांतपणे ऐकून घेणे, नियोजनबद्ध कामकाज, जबाबदाऱ्यांचे वाटप, जनसंपर्क आणि परिस्थितीनुसार निर्णय घेण्याची पद्धत या गुणांचा उल्लेख करावा लागतो.सार्वजनिक जीवनातील अनेक चढउतार, मतभेद, आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय निर्णय यांचे लेखकाने आपल्या दृष्टिकोनातून स्पष्टीकरण दिले आहे. त्यामुळे या आत्मकथनाकडे केवळ गौरवपर लेखन म्हणून न पाहता, एका राजकीय व्यक्तीने स्वतःच्या अनुभवांतून मांडलेला जीवनपट म्हणून पाहणे अधिक उचित ठरते.

मला या पुस्तकाच्या वाचनातील एक वैयक्तिक आठवण आवर्जून सांगावीशी वाटते. च्या सुमारास तत्कालीन नांदेड जिल्ह्यातल्या कंधार तालुक्यातील कलंबर सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या शुभारंभासाठी शरद पवार आले होते. त्या वेळी भोजनाच्या पंगतीत ते माझ्या शेजारी येऊन बसले.एवढे मोठे नेते आपल्या शेजारी जेवायला बसल्याचे पाहून मी संकोचाने उठण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांनी पाठीवर हात ठेवून, 'जेवताना उठू नये, बसा!' असे सहजपणे सांगितले. त्यांच्या या साधेपणाचा अनुभव आजही माझ्या स्मरणात ताजा आहे. मोठेपणाचा खरा अर्थ माणसांशी सहजतेने जोडलेले राहण्यात असतो, याची जाणीव या प्रसंगातून झाली.

या आत्मकथनातून दीर्घ सार्वजनिक जीवनातील अनुभव, निर्णयप्रक्रिया, राजकीय संबंध आणि काळानुरूप बदलणारे सामाजिक प्रश्न समजून घेण्याची संधी मिळते. अर्थात, आत्मचरित्र हे लेखकाच्या स्वतःच्या अनुभवांचे आणि दृष्टिकोनाचे कथन असते.त्यामुळे त्यातील राजकीय घटनांचे आकलन करताना इतर समकालीन नोंदी आणि स्वतंत्र दृष्टिकोन यांचाही विचार करणे आवश्यक आहे. ही चिकित्सक वाचनाची भूमिका पुस्तकाचे महत्त्व अधिक व्यापक करते.

एकंदरीत, 'लोक माझे सांगाती...' हे केवळ एका नेत्याचे आत्मकथन नसून महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सार्वजनिक जीवनातील साडेपाच दशकांच्या घडामोडींचा अनुभवाधारित दस्तऐवज आहे.राजकारण, समाजकारण, सहकार, शेती आणि नेतृत्व यांचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या वाचकांसाठी हे पुस्तक निश्चितच वाचनयोग्य आहे.सत्ता आणि पदांपलीकडे माणसांशी असलेले नाते, सतत शिकण्याची वृत्ती आणि काळाच्या प्रवाहात कार्यरत राहण्याची प्रेरणा या आत्मकथनातून मिळते.

ग्रंथपरिचय
ग्रंथाचे नाव : लोक माझे सांगाती...
लेखक : शरद पवार
प्रकार : राजकीय आत्मकथा
प्रकाशक : राजहंस प्रकाशन प्रा. लि., पुणे
पहिली आवृत्ती : डिसेंबर २०१५
पृष्ठसंख्या : ३५४
मूल्य : छ३८० (समीक्षेसाठी संदर्भित आवृती)

बिरसा मुंडा जयंती सप्ताहातून आदिवासी अस्मितेचा जागर;किनवटमध्ये विविध उपक्रमांची रेलचेल



किनवट/प्रतिनिधी-धरती आबा, आद्य क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या शतकोत्तर १५१ वी जयंती जनजातीय सप्ताह निमित्त विविध भरगच्च कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र किनवट येथे १३ ते १८ नोव्हेंबर दरम्यान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांनी उपस्थितांना मौलिक मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यभर विविध उपक्रमांच्या सूचना करण्यात आल्या होत्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, कुलगुरू डॉ.अशोक महाजन, कुलसचिव डॉ.ज्ञानेश्वर पवार व प्रभारी अधिष्ठाता चंद्रकांत बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाअंतर्गत बिरसा मुंडा जयंती निमित्त या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.आदिवासी समाजाचे माजी सैनिक बळीराम कुडमते व भीमराव तोडसाम यांचा सत्कार निसर्ग सेवा समिती वर्धाचे प्रियदर्शनी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त समाजसेवक मुरलीधर बेलखोडे यांच्या हस्ते करण्यात आला. जयंतीदिनी किनवट शहरातील बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास केंद्राचे प्रभारी समन्वयक डॉ.सुनील व्यवहारे व सहसमन्वयक प्रो.डॉ.सुरेंद्र शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. किनवट येथील केंद्रातही अभिवादन करण्यात आले. जयंती निमित्त आ.भीमराव केराम यांचा विद्यापीठाच्या वतीने केंद्रात सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर माजी नगराध्यक्ष आनंद मच्छीवार, नगरसेवक श्रीनिवास नेम्मानीवार, नगरसेवक संतोष मरस्कोले, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक उद्योजक यशवंत जाधव आदींचा सत्कार करण्यात आला. शहरात निघालेल्या शोभा यात्रेत सहभाग घेतला दुसऱ्या दिवशी आदिवासी सेवक, माधवराव मरस्कोले, आदिवासी सेवक केंद्राचे सल्लागार नारायण सिडाम, भागोराव शिरडे आदींचा सत्कार केंद्राचे सल्लागार सदस्य डॉ.अशोक बेलखोडे, बळीराम पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवराज बेंबरेकर व उपप्राचार्य डॉ.पंजाब शेरे यांच्या हस्ते करण्यात आला. तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाचा सांस्कृतिक पुरस्कार मिळालेले भालेराव दडांजे, त्याचबरोबर नुकतीच शासनाच्या वतीने आदिवासी कलाकारांना राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलाकार पेन्शन योजनेचा लाभ देण्यात आला. दिगंबर खोकले, गणपत कोरडे, कोंडबा टारपे, महादू वाकोडे व कीर्तनकार रामराव सलाम यांचा सत्कार शाहीर व सरस्वती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.मार्तंड कुलकर्णी व प्रो.डॉ.द्वारकाप्रसाद वायाळ यांच्या हस्ते करण्यात आला. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट व संशोधन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा व कौशल्य मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. सहाय्यक प्रकल्प अधिकारी राजेंद्र शेळके कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रो.द्वारकाप्रसाद वायाळ, श्रेयश अकादमीचे संचालक अमोल पाटील, आदिवासी विभागाचे निरीक्षक आनंद मेथे, विभागाचे शिक्षणाधिकारी श्रीकांत सानप यांनी मार्गदर्शन केले. या जयंती सप्ताह निमित्त विद्यापीठाच्या केंद्रात भारतातील आदिवासी क्रांतिकारकाचे चित्र व माहिती देणारे प्रदर्शन लावण्यात आल्यामुळे त्याचा लाभ विद्यार्थ्यांसह उपस्थितांना घेता आला. संशोधन केंद्रास सप्ताह निमित्त विद्युत रोषणाई व बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेसमोर भव्य वारली रांगोळी काढून दीपोत्सव साजरा करण्यात आला. केंद्राचे प्रभारी समन्वयक डॉ.सुनील व्यवहारे, सहसमन्वयक प्रो.डॉ.सुरेंद्र शिंदे, प्रा.चेतन जाधव, सेवक विठ्ठल हंबर्डे, रमेश जकुलवार, राजू जाधव, सुनील टेकाम, मुरलीधर पवार, रामचंद्र टेकाम, वर्षा मुकेरवार व विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमात सहभाग नोंदवला.

शिक्षण आयुष्यभर चालणारी निरंतर प्रक्रिया-प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे

कंधार/प्रतिनिधी-शिक्षण ही केवळ एका दिवसापुरती किंवा ठरावीक कालावधी पुरती मर्यादित प्रक्रिया नसून आयुष्यभर चालणारी निरंतर प्रक्रिया आहे, असे प्रतिपादन श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांनी केले.

पुढे बोलतांना डॉ.धोंडगे म्हणाले की, बदलत्या काळानुसार ज्ञान, कौशल्ये आणि विचारांची समृद्धी करत राहणे हेच खऱ्या शिक्षणाचे वैशिष्ट्य आहे. शैक्षणिक संस्थानी जपलेला समृद्ध शैक्षणिक वसा आणि उज्ज्वल वारसा अधिक सक्षमपणे पुढे नेणे, त्यातील मूल्यांची जोपासना करणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखणे यासाठी सर्वांनी प्रामाणिक प्रयत्न करावेत. शिक्षकांच्या ज्ञान, कौशल्य आणि अध्यापन क्षमतेत वृद्धी करून बदलत्या शैक्षणिक प्रवाहाशी त्यांना जोडण्यासाठी श्री शिवाजी हायस्कूल येथे १३ नोव्हेंबरपासून सुरू असलेल्या दहा दिवसीय वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षणाचा २२ नोव्हेंबर रोजी समारोप झाला. यावेळी ते बोलत होते.मुख्याध्यापक मुरलीधर घोरबांड, विस्तार अधिकारी गजानन पुंड, विस्तार अधिकारी सदाशिव सोनटक्के यांची प्रमुख उपस्थिती होती.दहा दिवसांच्या या प्रशिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, विद्यार्थी-केंद्रित अध्यापन, आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान, ताणतणाव व्यवस्थापन, शिक्षकांची बदलती भूमिका तसेच अध्ययन-अध्यापनातील नावीन्यपूर्ण उपक्रम अशा विविध विषयांवर सुलभकांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

विठ्ठल ते कपिलधार पायी ज्योत यात्रेचे उमरखेडमध्ये भव्य स्वागत

उमरखेड/प्रतिनिधी-विठ्ठल येथील श्री उमामहेश्वर संस्थान येथून श्री क्षेत्र कपिलधार (जि.बीड) येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त निघालेल्या श्री उमामहेश्वर-मन्मथ ज्योत यात्रेचे उमरखेड येथील छत्रपती शिवाजी वार्डातील महात्मा बसवेश्वर संस्थान शिव मंदिरात भव्य स्वागत करण्यात आले.



वीरशैव संत परंपरेतील सोळाव्या शतकातील संत श्री मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधी स्थळी, कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त व श्री मन्मथ स्वामी शिव साक्षात्कार दिनानिमित्त साजऱ्या होणाऱ्या सोहळ्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक आदी राज्यांतून लाखो भाविक सहभागी होतात.सलग दहाव्या वर्षी विठ्ठळ येथून ही ज्योत यात्रा निघाली आहे. उमरखेडमध्ये आगमन होताच संस्थांच्या वतीने ज्योत यात्रेचा गौरव चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संतोष माधव हिंगमिरे, माजी शिक्षण सभापती प्रकाशअप्पा दुधेवार, नगरसेवक गजानन रासकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. महाआरती करून उपस्थितांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी विठ्ठळ येथील दिलीप स्वामी आजनेकर महाराज, प्रभाकर दिघेवार, महात्मा बसवेश्वर संस्थानचे सचिव सुनील बिचेवार, संतोष रामजी हिंगमिरे, रत्नाकर पुजारी, अशोकअप्पा पुरमे, किसनअप्पा बिचेवार, बबनअप्पा पुरमे, सुधाकरअप्पा लाहेवार, सुभाषअप्पा भोकरे, बबनअप्पा भोकरे, राजेश दिघेवार, दिलीप बिचेवार, शिवहरीअप्पा बिचेवार, कोंडाप्पा दिघेवार, सौरभ बिचेवार, व्यवस्थापक काशिनाथ कुबडे,महिला भजनी मंडळ व अनेक शिवभक्त उपस्थित होते.ज्योत यात्रेच्या यशस्वीतेसाठी रामेश्वर बिचेवार, गजानन मुलंगे, राजू बोंतले, वसंत मुलंगे, विजय गांजरे, निलेश बोन्सले, वैभव सुकळे यांच्या पुढाकारात जवळपास ६० मन्मथ भक्त परिश्रम घेत आहेत. भक्तांसाठी महात्मा बसवेश्वर संस्थान व महिला भजनी मंडळातर्फे प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.तीन दिवसांच्या पायी प्रवासानंतर मन्मथ स्वामी साक्षात्कार दिनी म्हणजे कार्तिक पौर्णिमेला ज्योत यात्रा कपिलधार क्षेत्री पोहोचणार आहे. तिथे संपूर्ण यात्रेकरूंचे नियंत्रण व स्वच्छता अभियान विठ्ठळ येथील भक्त राबविणार आहेत.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

कंधार-लोहा विधानसभा मतदारसंघात विविध विकास कामांचा धूमधडाका



आ.चिखलीकर यांच्या हस्ते नारळ फोडून कोट्यावधीच्या विकास कामांचा झाला शुभारंभ

कंधार/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील बारूळ ते तेलूर या रस्त्याचे रुंदीकरणसह सुधारणा करणे ५ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष तथा माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते बारूळ कॅम्प येथे करण्यात आला. त्याचबरोबर तेलूर ता.कंधार येथे गावांतर्गत सी. सी. रस्ता, बंदिस्त नाली बांधकाम ४ कोटी रुपये निधीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. कौठा ता.कंधार येथील गावांतर्गत सीसी रस्ता, बंदिस्त नाली बांधकाम करणे ५ कोटी रुपये या कामाचे भूमिपूजन कौठा येथे करण्यात आले.

यावेळी कंधार नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, माजी उपनगराध्यक्ष जफरोद्दिन बाहोद्दिन, कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख, कंधार खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष किशनराव डफडे, सचिन पाटील चिखलीकर, कंधार नगरपालिकेच्या गटनेच्या अनुसयाताई केंद्रे, उपसभापती सुधाकरराव कौसल्य, गटविकास अधिकारी महेश पाटील, अभियंता सचिन आयतलवाड, शंकरराव नाईक, मारुती पाटील मजरे, मधुकरराव पाये, गुरुनाथ पाटील हुंबाड, चेतन केंद्रे, अनिल इटकापल्ले, महाजन पाटील, पांडुरंग पाटील चिंचोलीकर, सुनील कांबळे, साहेबराव पोटफोडे, नामदेव पवळे, सुनील कांबळे, माधव पाटील डोंगरगावकर, साईनाथ पाटील वडजे, देवीदास मजरे, रमेशराव धोंडीराम बोडलवार, महाजन कांबळे चांदु पठाण, सदाशिवराव इटकापल्ले, नामदेवराव मजरे, नारायण सावकार कुंभारे, शिवाजी वारखडे, कैलास वारखडे, बालाजीराव गालशेठवर शेषराव ढिकळे, बाळासाहेब पाटील कळकेकर, हनुमंतराव पाटील कळकेकर, गंगाधर जाधव, सुभाषराव वाघमारे, शिवराज पाटील कळकेकर, तेलूर ता.कंधार येथील सरपंच गजानन किसनराव वाघमारे, बळवंतराव व्यंकटराव काकडे, नामदेवराव बस्वदे, मारुतराव कऊटकर, बालाजी पाटील चिकाळे, त्र्यंबक काकडे, देवराव डावलमलके, अरुण सूर्यकांत मुंडकर, बाबजी काकडे, गणेश डुबुकवाड, सुदाम शेळगावे, गोविंद डावलमलके, राजू भंडारे संभाजी वाघमारे शेषराव काकडे गणपत वाघमारे, माजी सरपंच बालाजी पाटील बस्वदे, कौठा येथील तंटामुक्तीचे अध्यक्ष बाबुराव माधवराव देशमुख, सरपंच प्रतिनिधी शिवकुमार देशमुख रामदास कापसे, पप्पू देशमुख, गंगाराम विश्वनाथ हत्ते, मेहराज गुलाब शेख, गणेश गंगाधरराव देशमुख, विठ्ठल पाटील पवळे, उत्तमराव पाटील पवळे, कपिल शंकराव देशमुख, लालबा वाघमारे, दिनकर तवंडे, कृष्णा रामगीनवार, नागोराव देशमुख यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

वळग येथे जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या सांप्रदायांनी उभारला वनराई बंधारा

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील वळग येथे सध्या भीषण पाणीटंचाई जाणवत असून विहिरी व बोरवेलने तळ गाठला आहे. सुमारे ५००० हून अधिक लोकसंख्या असलेल्या या गावांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

यावर मात करण्यासाठी व जलसाठ्यात वाढ व्हावी या उद्देशाने येथील अखिल भारतीय हिंदू संग्राम सेना जिल्हा दक्षिण नांदेड तेलंगणा यांच्या स्तुत्य उपक्रम गावांमध्ये राबवत वनराई बंधारा उभारला आहे. सध्या परिस्थितीत वळग येथील नदीपात्र कोरडे पडले आहे. मात्र आगामी काळात या गावांमध्ये पाण्याची भीषण टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याने श्री गुरुदेव जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या सांप्रदायाने पुढाकार घेऊन बंधाऱ्याचे काम हाती घेतले. यासाठी वाळूचा मोठा ढीग करून व पोत्यामध्ये भरून पाणी अडवण्यासाठी पोत्याचे थर रचत बंधारा मजबूत करण्यात आला आहे. पाणीटंचाईच्या काळात गावकऱ्यांना पिण्यासाठी व वापरासाठी पाणी उपलब्ध व्हावे तसेच परिसरातील विहिरी व बोरवेलच्या पाणी पातळीत वाढ व्हावी यासाठी येथील श्री गुरुदेव जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या सांप्रदायांनी श्रम व सेवा, साधनांच्या माध्यमातून हा बंधारा उभारला आहे. या उपक्रमाचे या परिसरातून कौतुक होत आहे. यासाठी गावातील सर्व जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज सत्संग सेवा केंद्र वळग यांचे सांप्रदायातील सर्व भाविक भक्तांनी परिश्रम घेतले आहे.

जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात २३ नोव्हेंबरच्या सकाळी ६ वाजेपासून ते ७ डिसेंबर २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात ७ डिसेंबरच्या सकाळी ६ वाजेपासून ते २७ डिसेंबर २०२६ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.



ऑटो रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या संयुक्त कृती समिती राज्य जिल्हा शाखेच्यावतीने ऑटो रिक्षा चालकांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवशीय ऑटो बंद आंदोलन करण्यात आले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पीक विमा अर्जातील त्रुटींबाबत विमा कंपनीचे स्पष्टीकरण

मुखेड/प्रतिनिधी-प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अर्ज भरताना आणि पडताळणी प्रक्रियेत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींबाबत 'शेतकरी पुत्र संघर्ष समिती'चे अध्यक्ष बालाजी पाटील ढोसणे यांनी केलेल्या निवेदनाची इफको-टोकियो विमा कंपनीने अधिकृत पत्राद्वारे दखल घेतली आहे. तपासणीच्या नावाखाली शेतकऱ्यांचे अर्ज रद्द केले जात असल्याच्या मुद्द्याकडे समितीने लक्ष वेधले होते.

विमा कंपनीने दिलेल्या पत्रात अर्ज नाकारण्यामागील विविध तांत्रिक व कागदपत्रांच्या त्रुटी स्पष्ट केल्या आहेत. यामध्ये बँक पासबुक किंवा सातबारा उतारा नसणे, खाते क्रमांक व आयएफएससी कोडमधील तफावत, पीक पेरणीचे स्वयंप्रमाणपत्र नसणे, तसेच सीएससी/व्ही.एल.ई. मार्फत भरलेली चुकीची माहिती, विमाधारकाच्या नावातील फरक आणि संमतीपत्र अपलोड न करणे यांसारख्या कारणांचा समावेश आहे.यावर समितीने भूमिका मांडली आहे की, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना ऑनलाइन व तांत्रिक प्रक्रियेत अडचणी येतात. त्यामुळे अर्जातील त्रुटींची माहिती वेळेवर देऊन पात्र शेतकऱ्यांना कागदपत्रे दुरुस्त करण्याची संधी द्यावी आणि अर्ज तपासणीची प्रक्रिया पारदर्शक ठेवावी. केवळ पत्रव्यवहारापुरते न थांबता पात्र शेतकऱ्यांना प्रत्यक्ष विमा लाभ मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा इशारा ढोसणे पाटील यांनी दिला आहे.

जलकुंभावरुन पडून मजुराचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-चौफाळा परिसरात जलकुंभाचे बांधकाम सुरु आहे. या ठिकाणी परभणी शहरातील आनंदनगर येथील रहिवाशी मजूर शेख अन्सार शेख इब्राहिम (५०) हे काम करत होते. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास काम करत असताना शेख अन्सार यांचा जलकुंभावरुन तोल गेल्याने जमिनीवर पडले. यामध्ये गंभीर जखमी झालेल्या मजुराचा अखेर मृत्यू झाला.

माहूरगड बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

सकल हिंदू समाजाच्या आवाहनाला व्यापाऱ्यांचा पाठिंबा;दिवसभर प्रतिष्ठाने बंद



माहूर/प्रतिनिधी-हजरत टिपू सुलतान जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान आक्षेपार्ह गाणे वाजविण्यात आल्याच्या घटनेचे तीव्र पडसाद माहूर शहरात उमटले. या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने २२ नोव्हेंबर रोजी माहूर शहर बंदचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला व्यापारी वर्गासह नागरिक आणि शिवप्रेमी बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याने संपूर्ण माहूर शहरातील बाजारपेठ रविवार रोजी दिवसभर बंद राहिली.

बंदच्या पार्श्वभूमीवर सर्व शिवप्रेमी बांधव छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र जमले.यावेळी महाराजांच्या नामफलकाचा अभिषेक करण्यात आला. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला दुग्धाभिषेक व पंचामृत अभिषेक करून विधिवत स्नान घालण्यात आले. त्यानंतर संपूर्ण चौकाचे शुद्धीकरण करण्यात आले.टिपू सुलतान जयंतीच्या मिरवणुकीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौकात आक्षेपार्ह गाणे वाजविण्यात आल्याने निर्माण झालेला वाद आणि दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संबंधिता विरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी माहूर पोलीस प्रशासनाकडे करण्यात आली. यावर माहूर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी काही संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, अन्य संबंधितांविरुद्धही गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती दिली.सकल हिंदू समाजाच्या बंदच्या आवाहनाला व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत दिवसभर आपली प्रतिष्ठाने बंद ठेवली. शहरातील बाजारपेठेत शुकशुकाट पाहायला मिळाला. कोणताही अनुचित प्रकार न घडता माहूर बंद शांततेत पार पडला. या बंदच्या माध्यमातून नागरिकांनी निषेध नोंदवित संबंधित प्रकरणात कठोर कारवाईची मागणी केली.या वेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त लावला होता.

जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४५६/२०२६
(CNR No.MHND10-001738-2026)

अर्जदार -

१ जयवंत माधव किडे वय-४५ वर्षे धंदा-शेती
रा.चिखलभोसी ता.कंधार जि.नांदेड
२ बसवेश्वर पि.माधव किडे वय-४२ वर्षे धंदा-शेती
रा.चिखलभोसी ता.कंधार जि.नांदेड
हा.मु.बसवेश्वर नगर, जुना कौठा
VTC नांदेड ता.जि.नांदेड
३ सदाशिव पि.माधव किडे वय-३८ वर्षे धंदा-शेती
रा.चिखलभोसी ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ते ३ चे वडील नामे माधव पि.जयवंता किडे हे होते ते दिनांक २३-९-२०१६ रोजी मयत झाले आहे. तसेच अर्जदारांची आई नामे पार्वतीबाई भ्र.महादु उर्फ माधव किडे यांचा मृत्यु दिनांक १३/११/२०२१ रोजी झाला आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, मयत माधव पि.जयवंता किडे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना माधव पि.जयवंता किडे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत माधव पि.जयवंता किडे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-११/१२/२०२६

आज रोजी दि.२०/११/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कंधार यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४६९/२०२६
(CNR No.MHND10-001822-2026)

अर्जदार -

१ सत्यभामा भ्र.संजय वाघमारे वय-३६ वर्षे धंदा-घरकाम
२ अजय पि.संजय वाघमारे वय-२२ वर्षे धंदा-मजुरी
३ आरती पि.संजय वाघमारे वय-१५ वर्षे धंदा-शिक्षण
अ.पा.क.आई अर्जदार क्र.१ सत्यभामा
भ्र.संजय वाघमारे
सर्व रा.रहाटी ता.कंधार जि.नांदेड

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ ची सासु व अर्जदार क्र.२ व ३ यांची आजी नामे कोंड्याबाई रघुनाथ वाघमारे हे होते. ते दिनांक २८/०९/२०२६ रोजी मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ चे वडील संजय रघुनाथ वाघमारे हे होते ते दि. ०५/११/२०२३ रोजी मयत झाले आहे. तसेच अर्जदाराचे सासरे व अर्जदार क्र.२ व ३ चे आजोबा यापुर्वीच मयत झाले आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की, मयत कोंड्याबाई रघुनाथ वाघमारे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना कोंड्याबाई रघुनाथ वाघमारे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत कोंड्याबाई रघुनाथ वाघमारे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२३/१२/२०२६

आज रोजी दि.२१/११/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहायक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

जाहीर प्रगटन

आर.पी.शिंदे,न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,न्यायालय क्र.१,नांदेड यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१७०५/२०२६
शिवाजी लक्ष्मण पुयड वि.निबंधक/ग्रामसेवक

अर्जदार:- शिवाजी लक्ष्मण पुयड, वय ५३ वर्ष, व्यवसाय - मजुरी, रा.पिंपळगाव (मिश्री), ता.जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय,पिंपळगाव (मिश्री),ता.जि.नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार शिवाजी लक्ष्मण पुयड, वय ५३ वर्ष, व्यवसाय-मजुरी, रा.पिंपळगाव (मिश्री), ता.जि.नांदेड यांचा मुलगा नामे तिरुपती शिवाजी पुयड यांचा जन्म दिनांक २०.०४.२००८ रोजी राहत्या घरी पिंपळगाव (मिश्री) नांदेड येथे झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारांनी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक ०७.०१.२०२७ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रगटन आज दिनांक २१/११/२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपिक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - २७/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार श्री.गौतम बाबाराव कांबळे रा.सावळेश्वर ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.गौतम बाबाराव कांबळे रा.सावळेश्वर ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव गौतम बाबाराव कांबळे रा.सावळेश्वर ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०५/०७/१९८७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १०/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०७/०८/२०२६
स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

किनवटमध्ये दहा प्रभाग,अंगणवाड्या केवळ तीन

नगराध्यक्षा सुजाता एंड्रलवार यांचे महिला व बालविकास मंत्र्यांना निवेदन



किनवट/प्रतिनिधी-किनवट नगरपरिषदेच्या हद्दीतील दहा प्रभागात किमान प्रभाग निहाय एक अंगणवाडी असणे आवश्यक आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेता किनवट शहरात केवळ तीनच अंगणवाडी केंद्रे कार्यान्वित आहेत. परिणामी शहरातील बालकांच्या संगोपन, पोषण आणि शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्या पार्श्वभूमीवर किनवट शहरात प्रभागनिहाय अंगणवाडी व मिनी अंगणवाडी केंद्रे तातडीने मंजूर करावीत, अशी मागणी नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवार यांनी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, किनवट शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून प्रभाग रचनांमध्येसुद्धा बदल होतांना दिसतात.३० हजारांच्या आसपास असलेल्या लोकसंख्येच्या शहरात इनिमिनी तीन अंगणवाडीशाळा उपलब्ध आहेत. ० ते ६ वयोगटातील बालकांसाठी नाइलाजास्तव हजारो रुपये खर्च करून खासगी नर्सरीशाळेंत पाठवल्या जात आहे. गरोदरमाता व स्तनदा मातांनाही वेळेवर पोषण आहार, आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शन मिळण्यात अडचणी येत आहेत. लसिकरणाचा मुद्दा सुद्धा ऐरणीवर आलाय. बालकांच्या व मातांच्या हितासाठी प्रभागनिहाय नवीन अंगणवाडी व मिनी अंगणवाडी केंद्रे मंजूर करण्यासाठी नगराध्यक्ष सौ. एंड्रलवार यांनी मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. मंत्रालयातील विरोधी बाकावरच्या उबाठा.सेनेच्या किनवटच्या नगराध्यक्षा असल्यामुळे या पत्राचा मंत्र्यांवर फारसा प्रभाव पडेलच असे वाटत नाही. अविकसित तालुक्यासाठी विशेष बाब म्हणून मंत्री तटकरेंनी दखल घेतल्यास सहज शक्य होईलही. व्हाया आ. भीमराव केरामांच्या माध्यमातून पत्रव्यवहार केला असता तर थेट मुख्यमंत्र्यांकडून सोयीचे झाले असते. कारण महिला व बालकल्याण मंत्री मुख्यमंत्र्यांशिवाय स्वतंत्र निर्णय घेऊ शकतीलच हे अशक्य असल्याचे राजकीय वर्तुळातून ऐकायला मिळते.

चाकणकरांप्रमाणेच चंद्रकांत पाटलांनाही पदावरुन हटवा-धंगेकर

मुंबई/प्रतिनिधी-नाशिकच्या भोंदू अशोक खरात याच्या लैंगिक शोषण प्रकरणावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. राज्य महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्ष रुपाली चाकणकर यांना खरात प्रकरणामुळे पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. आता त्याच प्रकरणावरून शिवसेना (शिंदे गट) नेते आणि पुण्याचे माजी आ.रवींद्र धंगेकर यांनी भाजपला लक्ष्य केले आहे. चाकणकर यांच्याबाबतीत जो न्याय लावला, तोच निकष राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याबाबतीतही लावावा, अशी मागणी धंगेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

धंगेकर यांनी सोमवारी समाजमाध्यमावरील एक्स या प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत चंद्रकांत पाटील यांचा अशोक खरात याला वाकून नमस्कार करतानाचा फोटो प्रसिद्ध केला. खरातसाठी छत्री धरल्यामुळे रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला, तर खरातचे पाय धरणाऱ्या चंद्रकांतदादा पाटील यांच्याबाबतीत वेगळा निकष का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. रुपाली चाकणकर यांच्याबाबतीत जो निकष लावला, तोच चंद्रकांतदादा पाटील यांच्याबाबतीतही लावला पाहिजे, असे धंगेकर यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. गोकुळ दूध महासंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही धंगेकर यांनी चंद्रकांत पाटील आणि हसन मुश्रीफ यांच्यावर टीका केली होती. आता खरात प्रकरणावरून त्यांनी पुन्हा चंद्रकांत पाटील यांना लक्ष्य केल्याने शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपमधील राजकीय संघर्षाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

ना.नरहरी झिरवाळ यांचा उद्या नांदेड दौरा

नांदेड/प्रतिनिधी-राज्याचे अन्न व औषध प्रशासन तथा विशेष सहाय मंत्री नरहरी झिरवाळ हे मंगळवार, दि.२४ नोव्हेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता पुणे विमानतळ येथून विमानाने नांदेडकडे प्रयाण करतील. सकाळी ८.१५ वाजता गुरु गोविंदसिंह विमानतळ, नांदेड येथे आगमन व राखीव. स. ८.३० वाजता शासकीय वाहनाने हिंगोलीकडे प्रयाण करतील.स.११ वा.हिंगोली येथून नांदेड येथील शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण करून राखीव राहील. दु. २.३० वा. शासकीय विश्रामगृह, नांदेड येथून गुरु गोविंदसिंह विमानतळाकडे प्रयाण करतील. दु.३.३० वा.नांदेड विमानतळ येथून विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

खा.नागेश पाटील आष्टीकरांच्या गावातच आरोग्य यंत्रणेचा बोजवारा

आष्टीच्या आरोग्य उपकेंद्रात डॉक्टरांची दांडी;आ.कोहळीकरांचा संताप,थेट आरोग्यमंत्र्यांना फोन

हदगाव/प्रतिनिधी-हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्या आष्टी या गावातच शासकीय आरोग्य यंत्रणेचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात असताना प्रत्यक्षात मात्र आरोग्य केंद्रांमधील कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे या योजनांचा फोलपणा उघड होत असल्याचे चित्र समोर आले आहे.



हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी आष्टी येथील शासकीय आरोग्य उपकेंद्राला दि. २१ नोव्हेंबरला अचानक भेट दिली असता तेथे एकही वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले. एवढेच नव्हे, तर आरोग्य उपकेंद्रातील अस्वच्छतेचे चित्रही त्यांच्या पाहणीत समोर आले. ग्रामीण जनतेच्या आरोग्याची जबाबदारी असलेल्या शासकीय आरोग्य केंद्राची अशी अवस्था पाहून आ.कोहळीकर चांगलेच संतप्त झाले.आरोग्य उपकेंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी प्राथमिक उपचाराचे महत्त्वाचे केंद्र असते. विशेषतः गरीब, गरजू रुग्ण, महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक उपचारासाठी याच केंद्रांवर अवलंबून असतात. मात्र, डॉक्टरच कर्तव्यावर उपस्थित नसतील आणि आरोग्य केंद्रात स्वच्छतेचा अभाव असेल, तर सर्वसामान्य रुग्णांनी उपचारासाठी नेमके कुठे जायचे, असा संतप्त सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.या गंभीर प्रकाराची आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी तातडीने दखल घेत थेट राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. आष्टी येथील आरोग्य उपकेंद्रातील परिस्थितीची सविस्तर माहिती देत कर्तव्यावर गैरहजर असलेल्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांविरोधात निलंबनासह कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच आरोग्य यंत्रणेतील अशा प्रकारच्या निष्काळजीपणाला आळा घालण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

खासदारांच्या गावातच यंत्रणेची दुरवस्था

विशेष म्हणजे, खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्या स्वतःच्या गावातील आरोग्य उपकेंद्रातच अशी परिस्थिती आढळून आल्याने या घटनेची राजकीय वर्तुळातही चर्चा होण्याची शक्यता आहे. लोकप्रतिनिधींनी अचानक भेट दिल्यानंतर आरोग्य विभागातील वास्तव समोर आले असले, तरी अशा तपासण्या केवळ औपचारिक न राहता नियमितपणे होणे गरजेचे आहे.आता आरोग्यमंत्री या प्रकरणात नेमकी काय भूमिका घेतात, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होते का आणि आष्टीच्या आरोग्य उपकेंद्रातील अस्वच्छता व गैरव्यवस्थेला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई केली जाते का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.शासकीय आरोग्यसेवा ही जनतेचा अधिकार आहे, कोणत्याही अधिकाऱ्याची मर्जी नव्हे. कर्तव्यावर गैरहजर राहून रुग्णांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या निष्काळजी कर्मचाऱ्यांना पाठीशी न घालता त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

मांडवीतील अंगणवाडी क्र.१० मध्ये अमृत आहार योजनेला हरताळ

बालकांसह गर्भवती व स्तनदा मातांना अंडी मिळतच नाहीत

मांडवी/प्रतिनिधी-बालकांचे कुपोषण कमी करून त्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, यासाठी शासनाकडून विविध पोषण योजना राबविल्या जातात. मात्र, या योजनांच्या अंमलबजावणीतच हलगर्जीपणा होत असल्याचा प्रकार मांडवी येथे समोर येत आहे. मांडवी येथील अंगणवाडी क्र.१० मध्ये भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत मागील काही महिन्यांपासून बालकांसह गर्भवती महिला व स्तनदा मातांना अंडी दिली जात नसल्याचा गंभीर आरोप पालकांनी केला आहे.

नांदेड जिल्ह्यातील आदिवासीबहुल किनवट आणि माहूर तालुक्यांमध्ये बालकांमधील कुपोषण कमी करण्याच्या उद्देशाने अमृत आहार योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना पूरक आहार म्हणून अंडी किंवा केळी दिली जातात. तसेच गर्भवती महिला आणि स्तनदा मातांनाही गरम जेवणासोबत अंडी किंवा केळी देण्याची तरतूद आहे.मात्र, मांडवी येथील अंगणवाडी क्र.१० मध्ये संबंधित अंगणवाडी सेविकेकडून मागील काही महिन्यांपासून लाभार्थ्यांना अंडी दिली जात नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. शासनाकडून पोषण आहारासाठी निधी व तरतूद असताना प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा लाभ पोहोचत नसेल, तर याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित होत आहे.एकीकडे शासन बालकांचे कुपोषण दूर करण्यासाठी विविध योजना राबवित आहे, तर दुसरीकडे योजनेच्या अंमलबजावणीत अनियमितता होत असल्याचे आरोप होत आहेत. त्यामुळे संबंधित अंगणवाडीतील आहार वितरणाची महिला व बालविकास विभागाने गांभीर्याने दाखल घेऊन प्रत्यक्ष तपासणी करून मागील काही महिन्यांचा आहार वितरणाचा अहवाल तपासावा आणि दोषी आढळणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे. याप्रकरणी आमच्या प्रतिनिधीने महिला व बालविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधले असता संबंधित अंगणवाडीची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल असे सांगितले

डीजेवर भावना दुखावणारे गाणे वाजविल्याने तिघांवर गुन्हा दाखल

माहूर/प्रतिनिधी-माहूर शहरात हजरत टिपू सुलतान जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत प्रशासनाची बंदी आणि पोलिसांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत विनापरवानगी डीजे वाजविण्यात आला. याच मिरवणुकीदरम्यान धार्मिक भावना दुखावणारे आक्षेपार्ह गाणे वाजविल्याप्रकरणी माहूर पोलिसांनी तिघांविरुद्ध दि.२१ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी पोलीस कर्मचारी गजानन जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या कार्यालयीन आदेशानुसार जमावबंदी व शस्त्रबंदी लागू असताना तसेच डीजे वाजविण्यास प्रतिबंध असतानाही संबंधितांनी बेकायदेशीररीत्या डीजे लावून मोठ्या आवाजात मिरवणूक काढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दि. २० नोव्हेंबर रोजी सायं.७ ते ७.३० वाजेदरम्यान छत्रपती संभाजी नगर येथील वाहन क्रमांक एमएच १४ ईएल १३३ मधून डीजे लावून टिपू सुलतान जयंतीची मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचल्यानंतर डीजेवर आक्षेपार्ह गाणे वाजविण्यात आल्याचा आरोप आहे. यामुळे हिंदू धर्मीयांच्या धार्मिक भावना दुखावून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलमान्वये मिरवणुकीतील आयोजक व वाहनचालकासह तिघांविरुद्ध माहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास माहूर पोलीस करीत आहेत.

हनिफा बेगम भ्र.युसूफ मियाँ यांचे निधन

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी येथील रहिवाशी शेख साजीद मु.अ.जि.प.प्रा. शाळा हरनाळी, शेख माजीद पत्रकार यांच्या मातोश्री श्रीमती हनिफा बेगम भ्र.युसूफ मियाँ यांचे रविवारी दि.२२ रोजी पहाटे ४ वा. हदय विकाराने दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ६८ वर्ष होते.त्यांचा दफनविधी रविवारी सायंकाळी शहरातील कब्रस्तान येथे करण्यात आले.



आसना मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या आसना गार्डन वाचवा मोहिमेला आता लोकसहभागाचे बळ मिळत आहे. आसना गार्डनची स्वच्छता, संरक्षण आणि हरित परिसराचे संवर्धन करण्यासाठी ग्रुपच्या सदस्यांसह शहरातील नागरिकांनी श्रमदानात पुढाकार घेतला आहे. सकाळी सुरू झालेल्या श्रमदानात सौ. नंदाताई कल्याणकर, रूक्मिणीबाई सुकरे, कविता नागरगोजे, श्रीमती जोशी आणि वाळकीकर यांनी झाडू हातात घेत गार्डनमधील रस्त्यांवर साचलेला कचरा साफ केला.

जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/१६८६/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : १३-११-२०२६

जाहीर प्रगटन

संचिका क्रं.NT/०१/१५६७५/क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी
प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सौ.संगीता उत्तमराव शिंदे (ल.पु.नांव)** रा.**संगिता सुदर्शन देशमुख रा.तरोडा बु.,**नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि. ३०.१०.२००९ तरोडा बु.**गट नं.**१५२ चा भाग पैकी** प्लॉट क्रं.**१३ पिन क्र.४०११३०६०२६१** श्री. **सदाशिव गंगाराम देशमुख** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.१९७१ दि.०८/०४/२०२६** च्या आधारे विकत घेतली आहे/वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नावे कर आकारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

चर्तुःसिमाः- पुर्व- प्लॉट क्र.१४ आहे, **पश्चिम-**प्लॉट क्र.१२ आहे, **दक्षिण-**२० फुट रुंद रोड आहे, **उत्तर-**गट नं.१५१ चा भाग आहे.

स्वाक्षरित/-
सहाय्यक आयुक्त,
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जाहीर प्रगटन

६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१५६६/२०२६
नोटीस

अर्जदार : भगवान पुंडलिक कापुरे, वय ६८ वर्षे, रा.सांगवी बु. विमानतळ रोड नांदेड ता.जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : मा.आयुक्त महानगरपालिका,नांदेड

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार भगवान पुंडलिक कापुरे, वय ६८ वर्ष, रा.सांगवी बु. विमानतळ रोड,नांदेड ता.जि.नांदेड रोहिणी भगवान कापुरे/जन्म दिनांक स्वतः २२-०३-१९९१ रोजी राहत्या घरी येथे झाला असता अर्जदाराने जन्म प्रमाणपत्र रजिस्टर मध्ये नोंद होउन जन्म प्रमाणपत्र मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदारानी मागणी केले प्रमाणे संबंधीताचे नामे जन्म प्रमाणपत्र देण्या बाबत कुणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक १५/१२/२०२६ पर्यंत प्रत्यक्ष किंवा वकीला मार्फत अगर आपल्या प्रतिनिधी मार्फत या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता आपली बाजू मांडावी मुदतीत तशी तक्रार कोणाकडून न आलेस अर्जदार मागणी केल्या प्रमाणे त्यांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन आज दिनांक ०४-११-२०२६ रोजी या न्यायालयाच्या सही व शिक्यानिशी देण्यात आले.

स्वाक्षरित/-
के.डी.कनिष्ठ लिपीक
६ वे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,नांदेड

पान १ वरुन

नांदेडमधून राज्य सरकारविरोधात...

मतदान बॅलेट पेपरवर घेण्याची भूमिका मांडली. राज्य सरकारच्या विविध धोरणांबद्दल नाराजी व्यक्त करत त्यांनी सरकारच्या कारभाराचा निषेध नोंदविला. जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत राज्य सरकारच्या धोरणांविरोधात काळा दिवस पाळण्याची भूमिका त्यांनी मांडली. दुष्काळ, पाणीटंचाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जवसुलीतील सक्ती आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता या मुद्द्यांवर काँग्रेस आक्रमक भूमिका घेणार आहे. या सर्व प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी नांदेडमधून जनतेला सोबत घेऊन तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेत दिला. यावेळी खा.रविंद्र चव्हाण, माजी महापौर अब्दुल सत्तार, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, अब्दुल गफ्फार, श्रावण रॅपनवाड, डॉ.यशपाल भिंगे, ॲड.सुरेंद्र घोडजकर, पप्पु कोंडेकर, राजेश पावडे आदी उपस्थित होते.

यशवंत पाध्ये पत्रकारीता...

केल्या. कार्यक्रमास पत्रकार, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या छोटेखानी कार्यक्रमास राजेश पटणे, संदीप बारडकर, संदीप तरोडेकर, किरण कुलकर्णी, भास्कर कौडगे, भास्कर ढवळे, धनंजय कुलकर्णी, पुरुषोत्तम जोशी, सचिन डोंगळीकर यांच्यासह पत्रकार-हितचिंतकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नरेश दंडवते यांनी केले.

विधानसभा अध्यक्ष नार्वेकरांवर...

एकची आहे. पर्यंत आदिवासींकडून करण्यात आलेल्या सर्व तक्रारींचा निपटारा झाला असून, त्या तक्रारींमध्ये नार्वेकर कुटुंबीयांच्या नावाचा उल्लेखही नव्हता.२०२४ पर्यंत संबंधित जमिनीची मालकी बलदेवसिंह जाला यांच्याकडे होती. त्यानंतर आपल्या पत्नीने त्यांच्याकडून ही जमीन खरेदी केल्याचे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४